ISSN 2278-8158
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# ROYAL

Volume - X Issue - II December - May - 2021-22

Marathi Part - I

**Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47037**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 5.756
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"ROYAL"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta6060@gmail.com, www.ajantaprakashan.com

**ROYAL - ISSN 2278 - 8158 - Impact Factor - 5.756 (www.sjifactor.com)**

# EDITORIAL BOARD

**Prof. P. T. Srinivasan**
Professor and Head Dept. of Management Studies,
University of Madras, Chennai.

**Dr. Rana Pratap Singh**
Professor & Dean, School for Environmental Sciences,
Dr. Babasaheb Bhimrao Ambedkar University
Raebareily Road, Lucknow.

**Dr. P. A. Koli**
Professor and Head (Retdf.),
Dept. of Economics, Shivaji University, Kolhapur.

**Dr. Kishore Kumar C. K.**
Coordinator Dept. of P. G. Studies and Research in
Physical Education and Deputy Director of
Physical Education, Mangalore University, Mangalore.

**Dr. Sadique Razaque**
University Dept. of Psychology,
Vinoba Bhave University,
Hazaribagh, Jharkhand.

**Dr. S. Karunanidhi**
Professor & Head, Dept. of Psychology,
University of Madras.

**Dr. Uttam Panchal**
Vice Principal, Dept. of Commerce and
Management Science,
Deogiri College, Aurangabad.

**Dr. Ganesh S. Chandanshive**
Asst. Prof. & Head of Dept. in Lokkala Academy,
University of Mumbai, Mumbai.

**Dr. Kailas Thombre**
Research Guide and Asst. Prof.
Deogiri College Aurangabad.

**Dr. Rushikesh B. Kamble**
H.O.D. Marathi S. B. College of Arts and
Commerce, Aurangpura, Aurangabad. (M.S.)

**Dr. Shekhar Gungurwar**
Hindi Dept. Vasantrao Naik
Mahavidyalaya Vasarni, Nanded.

**Dr. Jagdish R. Baheti**
H.O.D. S. N. J. B. College of Pharmacy,
Meminagar, A/P. Tal Chandwad, Dist. Nashik.

**Dr. Manerao Dnyaneshwar Abhimanji**
Asst. Prof. Marathwada College of Education,
Dr. Rafique Zakaria Campus, Aurangabad.

**Memon Sohel Md Yusuf**
Dept. of Commerce, Nizwa College
of Technology, Nizwa Oman.



PUBLISHED BY

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | सातारा जिल्ह्यातील बौद्ध लेण्या व प्राचीन भारतातील व्यापारी मार्ग<br>**समीर मानकर** | १-८ |
| २ | सातवाहनकालीन तेर व माहूरझरी येथील लज्जागौरी उपासना: मूर्ती व लोकसंस्कृतीशास्त्रीय अभ्यास<br>**प्रा. डॉ. रामचंद्र गुरुसिंग घुले** | ९-१४ |
| ३ | श्री. नारायणेश्वरी मंदिर - शिलालेख<br>**श्री. संकेत राहुल फडके** | १५-१८ |
| ४ | भारतीय स्वातंत्र्याचे उदगाते छत्रपती शिवाजी महाराज<br>**डॉ. मधुकर विठोबा जाधव** | १९-२३ |
| ५ | अहमदनगर जिल्ह्यातील लाल निशाण गट व लालनिशाण पक्ष<br>**प्रा. डॉ. विधाटे गणेश शंकर** | २४-३० |
| ६ | छत्रपती प्रतापसिंह महाराजांची प्रजाहिताची धोरणे व सुधारणा<br>**डॉ. अजितकुमार दादासो जाधव** | ३१-३६ |
| ७ | शाहू मोडक आणि प्रभात फिल्म कंपनी<br>**डॉ. हमीद उमरअली काझी** | ३७-४६ |
| ८ | साताऱ्याच्या छत्रपतींच्या दरबारातील धार्मिक विधी - एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. रमेश धनराज जाधव** | ४७-५२ |
| ९ | महाराष्ट्राची स्वातंत्र्योत्तर वाटचाल व समस्या<br>**डॉ. चंद्रकांत बाबुराव कुंभार** | ५३-६० |
| १० | मूर्तीशास्त्र आणि स्थापत्य विषयाच्या अभ्यासासाठी उपयुक्त ग्रंथांची संक्षिप्त सूची<br>**प्रा. डॉ. गणेश राऊत** | ६१-६५ |
| ११ | ब्राह्मणेत्तर विचारधारेच्या परिप्रेक्षातून भास्करराव जाधव : एक ऐतिहासिक व्यक्तीमत्व<br>(इ.स. १८६७ ते १९५०)<br>**डॉ. गीतांजली भीमराव बोराडे** | ६६-७२ |
| १२ | वीर सिंदूर लक्ष्मण यांच्या बंडातील महत्त्वाचा नायक-नरसप्पा डुगरी नाईक<br>**प्रा. गौतम काटकर** | ७३-७७ |
| १३ | जत संस्थानातील स्त्री जीवन<br>**डॉ. सुरेश मारूती चव्हाण** | ७८-८२ |

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | महात्मा गांधीजींची लोकशाही विचारसरणी : एक दृष्टीक्षेप<br>**प्रा. डॉ. बाळासाहेब कोटलगी** | ८३-८९ |
| १५ | नेसरीचा इतिहास<br>**सौ. संगीता किरण लोखंडे** | ९०-९३ |
| १६ | भारतीय लोकशाही समोरील आव्हाने : अल्पसंख्यांकांच्या समस्या<br>**डॉ. सुनिता हनुमंतराव गित्ते** | ९४-९७ |
| १७ | मिरज आरोग्य पंढरी<br>**प्रा. डॉ. सौ. मंजिरी कुलकर्णी** | ९८-१०१ |
| १८ | नामदेव जाधव यांची दुसऱ्या महायुद्धात कामगिरी<br>**किरण गणपत कुंभार** | १०२-१०५ |
| १९ | बाबुराव ठाकूर यांची निर्भिड पत्रकारिता<br>**प्रा. डॉ. कोळसेकर मनोहर सुबराव** | १०६-११२ |
| २० | महात्मा गांधीचे शैक्षणिक आणि धार्मिक विचार आजच्या काळात प्रस्तुत आहेत का?- एक आकलन<br>**डॉ. प्रा. माणिक सोनावणे** | ११३-११९ |
| २१ | राजर्षि शाहू छत्रपती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर संबंध : एक दृष्टीक्षेप<br>**डॉ. चंपाताई श्रीरंग बोधले** | १२०-१२३ |
| २२ | वारीतून स्पष्ट होणारे सामाजिक भान<br>**लक्ष्मण गजानन गणगे** | १२४-१२९ |
| २३ | स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय लोकशाही पुढील आव्हाने : एक अवलोकन<br>**डॉ. प्रेमचंद गुंडू गायकवाड** | १३०-१३६ |
| २४ | भारतीय लोकशाही : दशा आणि दिशा<br>**डॉ. शर्मिला अशोक साबळे** | १३७-१४३ |
| २५ | आधुनिक काळात गांधीवादाच्या सामाजिक-आर्थिक तत्त्वांची प्रासंगिकता<br>**डॉ. प्रसाद सुरेश भागवत** | १४४-१४९ |
| २६ | छत्रपती प्रतापसिंह महाराज (थोरले) यांचे शैक्षणिक कार्य<br>**राहुल किसन गंगावणे** | १५०-१५४ |
| २७ | अष्टागरातील जुळंगाव चौल - रेवदंडा<br>**डॉ. एस. व्ही. पाथरकर** | १५५-१५८ |
| २८ | धुळे खजिना लूट : एक अभ्यास<br>**डॉ. उर्मिला क्षीरसागर** | १५९-१६२ |

# ५. अहमदनगर जिल्ह्यातील लाल निशाण गट व लालनिशाण पक्ष

**प्रा. डॉ. विधाटे गणेश शंकर**
इतिहास विभाग, राधाबाई काळे महिला महाविद्यालय, अहमदनगर, ता. जि. अहमदनगर.

**महत्त्वाचे शब्द -** कामगार किसान पक्ष, सिलींग, स्टेट फार्म कॉर्पोरेशन, खंडकरी, विडी सिगार कायदा, जागला,

**शोधनिबंधाचा उद्देश**

१. लाल निशाण गटाच्या स्थापनेची कारणमीमांसा स्पष्ट करणे.
२. लाल निशाण गटाचे लाल निशाण पक्षात झालेल्या स्थित्यंतराचा आढावा घेणे.
३. कॉम्रेड दत्ता देशमुख यांच्या लाल निशाण पक्षातील योगदानाचा आढावा घेणे.
४. ट्रेड युनियन चळवळीतील लाल निशाण पक्षाच्या कामगिरीचा मागोवा घेणे.
५. शेतकरी व शेतमजुरांच्या चळवळीतील लाल निशाण पक्षाच्या कामगिरीचा मागोवा घेणे.
६. राजकीय पटलावरून लाल निशाण पक्षाच्या अस्ताची कारणमीमांसा स्पष्ट करणे व त्याचे डाव्या चळवळीवर झालेल्या परिणामांचा आढावा घेणे.

**प्रस्तावना**

अहमदनगर जिल्हा हा आशिया खंडात सहकार चळवळीचा पाया रचणारा महत्वाचा जिल्हा होय. हा जिल्हा स्वातंत्र्यपूर्व आणि स्वातंत्र्यानंतर १९८० च्या दशकापर्यंत डाव्या चळवळींचा जिल्हा म्हणून ओळखला जात होता. या डाव्या पक्षांमधील भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या खालोखाल लाल निशाण गट व लाल निशाण पक्षानेअहमदनगर जिल्ह्यातील वंचित वर्गाच्या उन्नतीसाठी केलेल्या विविध आंदोलनांमुळे त्याला जनसामान्यांचा चांगले समर्थन प्राप्त झाले होते. मार्क्सवाद-लेनिनवादाची तत्त्वे अंगीकारून या पक्षाने आपल्या पक्षाला बौद्धिकदृष्ट्या भारतीय कम्युनिस्ट पक्षाशी जोडून ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. प्रस्तुत शोध निबंधात अहमदनगर जिल्ह्यातील कम्युनिस्ट पक्षाच्या समांतर लाल निशाण गट व लाल निशाण पक्षाने विविध चळवळींच्या संदर्भात केलेल्या कार्याचा आढावा घेण्यात आला आहे.

**लाल निशाण गटाची स्थापना**

१९५२ च्या निवडणुकीत डाव्या पक्षांना आलेल्या अपयशामुळे कामगार किसान पक्षातील कार्यकर्त्यांनी कामगार किसान पक्ष बरखास्त केला. पक्षाची ही पडझड पाहून कॅा. क्रांतिसिंह नाना पाटील यांनी कम्युनिस्ट पक्षात प्रवेश केला. उर्वरित कार्यकर्त्यांनी आपली भूमिका विशद करण्यासाठी 'लालनिशाण' साप्ताहिक काढले. पुढे १९५५ मध्ये कॅा. दत्ता देशमुख, कॅा. बापूसाहेब भापकर, कॅा. एस. के. लिमये, कॅा. यशवंत चव्हाण, कॅा. संतराम पाटील, कॅा. आबासाहेब काकडे, कॅा. नागनाथ नायकवाडी, कॅा. व्ही.एम. पाटील, भाई सथ्था यांनी लाल निशाण गटाची स्थापना केली. कम्युनिस्ट पक्षात सामील होण्याच्या धोरणामुळे लाल निशाण गटाने पक्ष स्थापन केला

नाही.[१] मुंबईसहित संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात लाल निशाण गटाने जिल्ह्यात इतर डाव्या पक्षांच्या मदतीने मोठी चळवळ उभारली. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची एकमुखी केलेली मागणी डावलून १६ जानेवारी १९५६ रोजी मुंबई केंद्रशासित प्रदेश घोषित करण्याचा निर्णय पं. नेहरूंनी जाहीर करताच संयुक्त महाराष्ट्र समितीच्या आदेशावरून लाल निशाण गटाच्या का. बापूसाहेब भापकर यांनी जिल्हा लोकल बोर्डाचा व नगरपालिका सदस्यत्वाचा तर का. भास्करराव औटी यांनी राज्य विधानसभेचा राजीनामा दिला.[२] १९५७ च्या निवडणुकीच्या वेळी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या तिकीटावर लाल निशाण गटाचे ८ आमदार निवडून आले. त्यात अहमदनगर जिल्ह्यातील ४ आमदारांचा समावेश होता. त्यामुळे अहमदनगर जिल्ह्यात लाल निशाण पक्षाला मानाचे स्थान प्राप्त झालेले दिसते.[३]

**लाल निशाण गट लाल निशाण पक्ष म्हणून संघटन व उद्दिष्ट**

संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर समिती मधील पक्षांमध्ये बेबनाव वाढू लागला. १९६२ साली संयुक्त महाराष्ट्र समितीत फाटाफुट झाली. कॉंग्रेसच्या बेरजेच्या राजकारणाला बळी पडून नगर जिल्ह्यातील डाव्या पक्षातील अनेक कार्यकर्ते कॉंग्रेस पक्षात सामील झाले. लाल निशाण गटाने कम्युनिस्ट पक्षात सामील होण्याचा निर्णय घेतला. परंतु १९६४ साली कम्युनिस्ट पक्षात फुट पडून कम्युनिस्ट चळवळीत विस्कळीतपणा आला. त्यामुळे लाल निशाण गटाने (दत्ता देशमुख गटाने) 'लाल निशाण' पक्ष म्हणून संघटित करण्याचा निर्णय १९६५ साली घेतला व पक्षाचे मुखपत्र म्हणून 'लालनिशाण' हे पाक्षिक सुरू केले. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीनंतर निवडणुकीचे स्वरूप पालटले. तात्विक मुद्यांवरून लढविल्या जाणाऱ्या निवडणुका धनशक्तीवर लढविल्या जाऊ लागल्या. त्यामुळे 'लालनिशाण पक्ष' असे नामाभिधान धारण करूनही निवडणुकांपासून लालनिशाण पक्ष दूरच राहिला. निवडणुकीमध्ये शक्ति व सामर्थ्य खर्ची न करण्याचे धोरण पक्षाने स्वीकारले व कष्टकरी समुदायाला जागृत व संघटित करण्याला प्राधान्य दिले.[४]

**लाल निशाण पक्षाचेअहमदनगर जिल्हा लोकल बोर्डातील कार्य**

लालनिशाण पक्षाने शहरापासून ते गावपातळीपर्यंत कामगारांसाठीच्या संघटना बांधणीवर आपले लक्ष केंद्रित केले. १९५२-५३ साली नगर जिल्हा लोकल बोर्डात लाल निशाण गटाचे बहुमत होते. त्याचा संघटनात्मक बांधणीसाठी लाल निशाण गटाने उपयोग केला. लाल निशाणने लोकल बोर्डातर्फे दुष्काळी कामे केली. सार्वजनिक बांधकाम खाते, रस्त्यावरील मैल बिगाऱ्यांना व पाटबंधारे कामगारांना अतिशय वेतन कमी होते. त्यांच्या सेवेची शाश्वती नव्हती. त्यांना नोकरीत कायम करावे, मासिक पगार द्यावा इत्यादी मागण्या लाल निशाण पक्षाने केल्या. सरकारने त्यासाठी कालेलकर यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीवर कॅा. मधुकर कात्रे यांची निवड करण्यात आली. वरील खात्यातील हजारो कामगारांना कायम करणे, त्यांचे रोजंदारीचे दर व अन्य सेवाशर्ती लागू करणे या कमी त्यांनी अपार मेहनत घेतली. १९६७ साली सरकारने कालेलकर कमिशनच्या शिफारसी लागू केल्यामुळे हजारो कामगारांना त्याचा लाभ झालेला दिसतो. हे करत असतांना कामगारांचे जाणतेपण वाढविण्याचे काम पक्षाने केले. त्यामुळे नगर जिल्हा लोकल बोर्डाचा लौकिक वाढण्यास मदत झाली.[५] सरकारी नोकर संघटनेला राज्यव्यापी स्वरूप देण्यात अहमदनगरच्या लाल निशाण गटाच्या कॅा. दिनकरराव कलावडे यांचे महत्वाचे

योगदान होते. राज्य सरकारी कर्मचाऱ्यांची पहिली परिषद एप्रिल १९६२ मध्ये लाल निशाण गटाने अहमदनगरला भरविली होती. कॅा. र. ग. कर्णिक हे राज्य कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस होते. जिल्ह्यातील सरकारी-निमसरकारी, कामगार-कर्मचारी व शिक्षकांच्या एकजुटीच्या परिषदा १९७४ साला पासून लालनिशाण पक्षाने भरविण्यास सुरुवात केली होती. १९७७-७८ च्या १० लक्ष कामगार, कर्मचारी, शिक्षक, कोतवाल यांच्या ५४ दिवसांच्या ऐतिहासिक संपाचे नेतृत्व करणाऱ्या समन्वय समितीची पायाभरणी नगर जिल्ह्यातील या चळवळीने केलेली दिसते.[६]

**स्टेट फार्म कॉर्पोरेशनमधील लाल निशाण पक्षाचे योगदान**

१९६२ साली महाराष्ट्र सरकारने सिलींगचा कायदा पास केला. सिलींगचा मुळ उद्देश बड्या जमीनदारांच्या जमिनी काढून घेऊन त्या भूमिहीन शेतकऱ्यांना वाटणे हा होता. ज्या शेतकऱ्यांनी अल्प खंडाने व दिर्घ मुदतीने आपल्या जमिनी साखर कंपनीला लागवडीसाठी दिल्या होत्या त्या जमिनी सिलींगच्या नावावर सरकारने साखर कंपन्यांकडून काढून घेतल्या व त्यांचे स्टेट फार्म कॉर्पोरेशन स्थापन केले. लाल निशाण गटाने स्टेट फार्म कॉर्पोरेशनच्या स्थापनेत महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. कॅा. दत्ता देशमुख हे स्टेट फार्म कॉर्पोरेशनच्या संचालक मंडळाचे सभासद होते.[७] किसान सभा व कम्युनिस्ट चालवत असलेल्या खंडकरी शेतकऱ्यांचा लढा बागायतदारांचा असून कम्युनिस्ट बड्या बागायतदारांचे हित पाहत असल्याचा लालनिशाण पक्षाने आरोप केला. सरकारी शेती हे पुरोगामी पाऊल असून ते मोडण्याची भूमिका घेऊन किसान सभा व कम्युनिस्ट पक्ष खाजगी मालकीच्या शेतीचा पाठपुरावा करीत आहेत. तसेच शेती महामंडळ मोडल्यामुळे महामंडळाकडील कामगार बेकार होणार आहेत. त्यामुळे कॉंग्रेस, समाजवादी व कम्युनिस्टांची ही भूमिका कामगार विरोधी असल्याचा ठपका ठेवून अहमदनगर जिल्हा लालनिशाण पक्षाने कम्युनिस्टांच्या अधिपत्याखालील खंडकरी शेतकऱ्यांच्या चळवळीला विरोध करण्याची भूमिका घेतली. त्यामुळे खंडकरी शेतकऱ्यांची चळवळ व स्टेट फार्मिंग कॉर्पोरेशन मोडीत काढण्याच्या प्रश्नावरून नगर जिल्ह्यात लाल निशाण विरुद्ध इतर पक्ष असा संघर्ष उभा राहिलेला दिसून येतो.[८]

**लाल निशाण पक्षाचेट्रेड युनियन चळवळीमधील कार्य**

संगमनेर व अकोले तालुक्यात का. रामभाऊ नागरे, कॅा. बी.डी. परब यांची लाल बावट्याची व साथी भास्करराव दुर्गे यांचीसमाजवाद्यांची अशा विडी कामगारांच्या दोन युनियन होत्या. या युनियनचे नेतृत्त्व करणारे पुढारी विडी कामगारांचे प्रश्न कोण अगोदर सोडवितो आहे, कामगारांना कोणी किती मजुरी व बोनस मिळवून दिला आहे याचाच पाढा वाचत असत. त्यामुळे एक प्रकारे विडी कामगारांच्या चळवळीत फुटीचे वातावरण तयार होवून कामगारांचे प्रश्न सुटण्यात अडचणी व अडथळे येऊ लागले. त्यामुळे विडी कामगार युनियनचे कामकाज एकजुटीने चालावे याकरिता लाल निशाण गटाच्या का. दत्ता देशमुख यांनी अकोले तालुक्यातील 'गणोरा' येथे परिषद घेऊन एकजुटीचा प्रयत्न केला. या परिषदेला का. क्रांतिसिंह नाना पाटील उपस्थित होते. का. दत्ता देशमुख हे 'विडी कामगारसमिती' युनियनचे अध्यक्षही होते.[९] संगमनेर, अकोले तालुक्यात विडी कामगारांची युनियन कम्युनिस्ट पक्षाच्या सहकार्याने उभी करण्यामध्ये लाल निशाण पक्षाच्या राधाकिसन सोनवणे, बाळा देशमुख, कॅा. मधुकर कात्रे, कॅा. काशीनाथ आळवणी यांनी भागीदारी केलेली दिसते. पुढे कम्युनिस्ट पक्षाच्या पुढाऱ्यांनी १९६३ नंतर विडी कामगार युनियन मधून लाल निशाण पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची राजकीय कारणांसाठी हकालपट्टी केली. तरीही

पुढील ८ ते १० वर्षे नवीन संघटना न काढता लाल निशाणशी पक्षाला मानणाऱ्या विडी कामगारांनी त्याच युनियन मध्ये रहावे, असे धोरण पक्षाने राबवले. पुढे १९६६ चा विडी सिगार कायदा सन १९७१ मध्ये केंद्र सरकारने प्रत्यक्षात लागू केल्यावर संगमनेर, अकोले, सिन्नर भागातील कामगारांमध्ये मोठ्या अपेक्षा निर्माण झाल्या. मात्र तत्कालीन संघटना पुरेश्या कार्यक्षम नसल्याने कामगारांमध्ये नाराजी वाढली. तेव्हा सन १९७२ मध्ये कॅा. मधुकर कात्रे व कॅा. दत्ता देशमुख यांच्या मदतीने 'संगमनेर, अकोले, सिन्नर तालुका विडी कामगार समिती' या नावाने एक व्यासपीठ स्थापन करण्यात आले. १९६६ च्या विडी सिगार विविध हक्क मिळवून घेण्यासाठी कामगारांचे अर्ज, तक्रारी भरून घेऊन कामगार खात्याकडे देण्याची मोहीम सुरू केली. मात्र अन्य संघटनांनी सरकारी पातळीवर याला आक्षेप घेतला. त्यामुळे कॅा. मधुकर कात्रे यांनी याच नावाने ट्रेड युनियन कायद्याखाली संघटनेची नोंदणी केली. सन १९७३ मध्ये ८०० सभासद संख्या असलेल्या ह्या युनियनची सभासद संख्या २००० सालापर्यंत ५००० च्या पुढे गेली. कॅा. दादाभाऊ देशमुख, कॅा. सुखदेव वर्पे, कॅा. वसंतराव मिस्त्री, कॅा. ता. गो. देशमुख, कॅा. गुलाबराव देशमुख आदी कार्यकर्त्यांनी कॅा. दत्ता देशमुख व कॅा. मधुकर कात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेर, अकोले, सिन्नर तालुका विडी कामगार युनियनचे कामकाज चालविले. मात्र जिल्ह्यातील लाल बावट्याच्या युनियनच्या तुलनेत या युनियनचे राजकीय व संघटनात्मक सामर्थ्य कमी असल्याचे दिसून येते.[१०]

पश्चिम महाराष्ट्रात गावागावात 'जागल्याचे' काम करणारे ३५ हजार कोतवाल होते. त्यांना सरकारी नोकर म्हणून घ्यावे आणि पगारी नोकरदार म्हणून ठेवावे अशी मागणी नगर जिल्ह्यातील लाल निशाण पक्षाने केली. कोतवाल हा गावातील सर्वात तळाचा कामगार. त्याचीही राज्यव्यापी संघटना उभी करण्याचे काम लाल निशाण पक्षाने केले. पुढे ग्रामपंचायत, नगरपालिका कामगार, रेशन कार्डधारकांची संघटना उभारण्याचा प्रयत्न लाल निशाण पक्षाने केला.[११]

नगर जिल्ह्यातील लाल निशाण पक्षाने साखर कामगार चळवळीत दिलेले योगदान हा त्यांच्या वाटचालीचा महत्वाचा टप्पा होय. १९५६ साली बेलवंडीच्या खाजगी साखर कारखान्यात लाल निशाण गटाच्या कॅा. रंगनाथ पंदरकर व कॅा. मधुकर कात्रे यांनी साखर कामगारांची व शेतीवरील कामगारांची नगर जिल्ह्यातील पहिली संघटना स्थापन केली.[१२] राज्यातील साखर कामगार चळवळ ही बी.आय.आर. ॲक्ट या काळ्या कायद्याच्या जोखडात बांधली गेली होती. लाल निशाण पक्षाने नगर जिल्ह्यात संगमनेर, श्रीगोंदा, पारनेर, जगदंबा इत्यादी कारखान्यांमध्ये साखर कामगारांच्या प्रतिनिधिक संघटना उभारल्या होत्या. श्रीरामपूर, कोपरगाव भागात जुन्या संघटना होत्या. मात्र त्या संघटनांच्या कार्यक्षेत्रातील प्रवरा, टिळकनगर, हरेगाव, कोळपेवाडी, संजीवनी, लक्ष्मीवाडी, साखरवाडी इत्यादी कारखान्यांमधील कामगारांमध्ये व्यवस्थापनाकडून होणाऱ्या पिळवणुकीविरुद्ध असंतोष होता. अशा वेळी लाल निशाण पक्षाचे पुढारी या कारखान्यांमधील कामगारांच्या मदतीला धावून जात असत. बी.आय.आर ॲक्टमधील काळ्या तरतुदींचा फायदा घेऊन कामगार वर्गावर मानसिक दबाव आणून युनियनचे प्रातिनिधिकत्व रद्द करणाऱ्या व्यवस्थापनाला नमते घेण्यास लाल निशाण पक्षाच्या पुढाऱ्यांनी यश प्राप्त केल्याचे दिसते.[१३] १९८० साली महाराष्ट्रातील ऊस तोडणी आणि गाडीवान कामगारांचा पहिला यशस्वी संप लाल निशाण पक्षाच्या कॅा. मधुकर कात्रे यांनीच पुकारला होता. त्यातून साखर सम्राट व त्यांच्या इशाऱ्यावर नाचणाऱ्या राज्य

शासनाला पक्षाने वठणीवर आणले. कॉ. मधुकर कात्रे हे महाराष्ट्र राज्य साखर कामगार महासंघाचे सरचिटणीस होते. हा महासंघ पुढे साखर कामगारांची लढाऊ तुकडी म्हणून पुढे आला.[१४]

१९५५ पासून नगर जिल्ह्यात शेतमजूर चळवळीची लाल निशाण गटाने उभारणी केली. कॉ. भास्करराव जाधव, कॉ. मधुकर कात्रे, कॉ. दत्ता देशमुख, कॉ. भि. र. बावके यांनी नगर जिल्ह्यात शेतमजूरांच्या अनेक संपात भागीदारी केली. ८ फेब्रुवारी १९७० रोजी श्रीरामपूर (जिल्हा अहमदनगर) येथे महाराष्ट्र राज्य भूमिहीन शेतमजूर व गरीब शेतकरी परिषद स्थापन करण्यात लाल निशाण, भाकप, माकप या पक्षांचा मोलाचा वाटा होता. कॉ. डांगे, कॉ. गोदावरी परुळेकर, कॉ. दत्ता देशमुख, साथी एस. एम. जोशी हे या परिषदेस उपस्थित होते. परिषदेत 'ज्याच्या हाताला नांगराचा घट्टा त्याच्या नावाने जमिनीचा पट्टा' असा जमिनविषयक ठराव पास करण्यात आला. १९७२-७३ च्या दुष्काळात दुष्काळी कामगारांच्या चळवळीने महाराष्ट्र ढवळून निघाला. १७ व १८ फेब्रुवारी १९७३ रोजी दहिवडी (जि. सातारा) येथे महाराष्ट्र राज्य भूमिहीन शेतमजूर व गरीब शेतकरी परिषदेचे अधिवेशन झाले. त्याचे अध्यक्ष कॉ. दत्ता देशमुख व प्रमुख पाहुणे प्रा. वि. म. दांडेकर व कॉ. एस.पी. मोहिते हे होते. कॉ. दत्ता देशमुख यांनी अध्यक्षपदावरून 'कफल्लक महाराष्ट्रीय कष्टकरी जनता आपल्या जुटीची मूठ वळून उभी राहिली आहे, या जनतेने स्वाभिमानाने आवाज काढला आहे की मला भीक नको, मला काम पाहिजे. मला केवळ पोटभरू काम नको. माझ्या भूमीला सुजला करणारे दुष्काळ निर्मूलनाचे काम पाहिजे' असा नियोजनपूर्वक श्रमशक्ती वापरुन दुष्काळ निर्मूलनाचा विचार मांडला.[१५] या परिषदेच्या माध्यमातून कॉ. दत्ता देशमुख व प्रा. वि. म. दांडेकर यांनी दुष्काळ निर्मूलन, पाणी प्रश्न आणि रोजगार यांची सांगड घालणारी प्रचंड चळवळ महाराष्ट्रात निर्माण केली. १६ मे १९७३ रोजी जिल्ह्यातील ३ लक्ष दुष्काळी कामगारांचा संप लाल निशाण पक्षाने संघटित केला. याच चळवळीतून रोजगार हमी कायदा निर्माण करणे महाराष्ट्र सरकारला भाग पडले.[१६] १९७८ साली चळवळीला मदतीसाठी लाल निशाण पक्षाच्या कॉ. दत्ता देशमुख, कॉ. मधुकर कात्रे व कॉ. भास्करराव जाधव यांनी 'ग्रामीण श्रमिक' हे पाक्षिक वृतपत्र काढले.[१७]

**लाल निशाण पक्षातील वैचारिक मतभेद व पक्षात पडलेली फुट**

भांडवलदारी सतेच्या विरोधात कामगार वर्गाच्या नेतृत्वाखाली जनतेची लोकशाही प्रस्थापित करणे हे लालनिशाण पक्षाचे धोरण होते. लालनिशाण पक्षातील कॉ. दत्ता देशमुख, कॉ. एस. के. लिमये, कॉ. संतराम पाटील यांना कॉंग्रेस पक्षातील रशिया, चीन बरोबर सहकार्य करू पाहणाऱ्या पं. नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी या पुरोगामी नेत्यांबद्दल आस्था वाटू लागली होती. कॉंग्रेसचे प्रतिगामी स्वरूप बदलून जनमाणसात तिला मूल्याधिष्ठित स्थान प्राप्त करून देण्याचा इंदिरा गांधी यांनी प्रयत्न केला होता. लालनिशाण पक्षाने इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्याशी देशातील खालावलेल्या राजकीय स्थितीवर चर्चा करतांना पुरोगामी म्हणविल्या जाणाऱ्या राजकीय पक्षांनी कॉंग्रेस विरोधासाठी अनेक राजकीय पक्षांशी युती करून प्रतिगामी व फुटीरतावादी शक्तींना मोकळी वाट करून दिल्याचा निष्कर्ष काढला. त्यांनी असे सूचित केली की, "कामगार कष्टकऱ्यांशी संबंध असलेल्या सर्व कम्युनिस्ट, समाजवादी, लोकशाहीवादी यांना धर्मांधांच्या विरोधात हाक देऊन देशव्यापी बांधणी करण्यासाठी एकजूट साधावी."[१८] कॉ. दत्ता देशमुख व त्यांच्या सहकाऱ्यांच्या या भूमिकेला पक्षातूनच विरोध होऊ

लागला व पक्षात दोन गट पडले. कॅा. भास्करराव जाधव, कॅा. कात्रे, कॅा. भोसले, कॅा. सुरेश गवळी यांनी लालनिशाण पक्ष (लेनिनवादी गट) या नावाने आपला वेगळा पक्ष स्थापन केला. या पक्षाने राजकीय निवडणुकांमध्ये कोणत्याही पक्षाचे समर्थन न करता अगर निवडणुकांमध्ये सहभागी न होता आपल्या पक्षाची चळवळ ट्रेड युनियन पुरतीच मर्यादित केली. कॅा. दत्ता देशमुख, कॅा. एस. के. लिमये, कॅा. संतराम पाटील यांच्या नेतृत्वाखालील लालनिशाण पक्षाचे ५ नोव्हेंबर १९८९ रोजी अधिवेशन भरले. त्यात कॅा. दत्ता देशमुख यांची लालनिशाण पक्षाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. कॅा. दत्ता देशमुख यांच्या लाल निशाण पक्षाने १९८९ व १९९१ मधील निवडणुकांमध्ये प्रतिगाम्यांचा पराभव करण्यासाठी कॉंग्रेस पक्षाला पाठिंबा दिला. कम्युनिस्ट पक्ष व इतर डावे पक्ष मात्र अलिप्त राहिल्याने जातीयवादी शक्तींना उधाण आलेले दिसते. नवजीवन संघटनेच्या स्थापनेपासून 'पक्ष अनेक असले तरी देशातील कामगारांची एकच एक संघटना असली पाहिजे, प्रत्येक धंद्यात एकच युनियन असली पाहिजे, पक्षवाचक युनियन बनता कामा नये किंवा फुटता कामा नये', अशी मूळच्या लालनिशाण पक्षाची भूमिका होती. मात्र आपल्या या घोषित भूमिकेनुसार लालनिशाण पक्षाचे धुरीणत्व व्यवहार करू शकले नाही. त्यामुळे लालनिशाण पक्षाची अहमदनगर जिल्ह्यातील राजकीय चळवळीची व ट्रेड युनियन चळवळीची मोठी हानी झाली.[१९] कम्युनिस्ट पक्षाला उतरती कळा लागत असतांना लालनिशाण पक्षात पडलेल्या या फुटीमुळे अहमदनगर जिल्ह्यातील डाव्या पक्षांची चळवळ कमजोर झालेली दिसते.

**निष्कर्ष**

अहमदनगर जिल्हा हा जहाल डाव्या विचारांचा जिल्हा म्हणून ओळखला जात होता. १९५२ च्या निवडणुकीत आलेल्या अपयशाच्या पार्श्वभूमीवर लाल निशाण गट व पुढे लाल निशाण पक्षाची स्थापना झाली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळात संयुक्त महाराष्ट्र समितीच्या तिकिटावर या पक्षाने अहमदनगर जिल्ह्यात चार आमदार निवडून आणण्याची कामगिरी केली. लाल निशाण गट हा कम्युनिस्ट विचारांचा समर्थक असलेला पक्ष. मात्र संयुक्त महाराष्ट्राची निर्मितीमुळे समान कार्यक्रमाचा अभाव व १९६४ साली कम्युनिस्ट पक्षात पडलेल्या फुटीमुळे लाल निशाण गटाने कॉम्रेड दत्ता देशमुख यांच्या नेतृत्वाखाली लाल निशाण पक्ष म्हणून संघटीत होण्याचा निर्णय घेतला. निवडणुकीच्या राजकारणात न रमता आपले सामर्थ्य व मर्यादा याची जाणीव ठेवून या पक्षाने ट्रेड युनियन चळवळ, स्टेट फार्म कॉर्पोरेशन, कोतवालांचे प्रश्न, दुष्काळी कामांचे प्रश्न इत्यादी समस्यांवर आपले लक्ष केंद्रित केले. मात्र पुढे प्रतिगामी भांडवली, धर्मांध, फॅसिस्टविचारांच्या पक्षांना आवर घालण्यासाठी कॅा. दत्ता देशमुख, कॅा. एस. के. लिमये, कॅा. संतराम पाटील यांनी कॉंग्रेस पक्षाला सहकार्य करण्याची घेतलेली भूमिका लाल निशाण पक्षातील काही धुरिणांना न आवडल्याने लाल निशाण पक्षात फुट पडून अहमदनगर जिल्ह्यातील डाव्या विचारांच्या पक्षांची व चळवळीची मोठी हानी झाली. व पक्षाचे जिल्ह्याच्या राजकीय पटलावरील अस्तित्व कमी झालेले दिसते.

**संदर्भसूची**

१. शेवाळे विठ्ठल, संपादन, ' मी दतूचा दत्ता झालो त्याची गोष्ट', चि. स. लाटकर कल्पना मुद्रणालाय, सदाशिव पेठ, पुणे, ३०, पृ. क्र. ५०

२. भापकर रंगनाथ,'क्रांतिगाथा-बापूसाहेब भापकर: जीवन व कार्य', गणराज प्रकाशन, अहमदनगर, प्रथमावृत्ती, ५ सप्टेंबर २०१४, पृ. क्र. ९१.

३. दैनिक सार्वमत, 'वर्धापन दिन विशेषांक-कर्तुत्वाचा ठेवा', दि. २६/०१/२०१३, पृ. क्र.२३.

४. शेवाळे विठ्ठल (संपा.), 'उज्ज्वल उद्यासाठी', (दिवंगत कॅा. दत्ता देशमुख विशेषांक) 'संघर्षयात्री', आनंद प्रिंटर्स, संगमनेर, त्रैमासिक नोव्हेंबर ते डिसेंबर २०१५, पृ. क्र. १५.

५. कॅा. मधुकर कात्रे यांच्या आठवणी व आत्मनिवेदन (राजकीय जडणघडण), कॅसेट क्रमांक ५, दि. २२/१०/२००६.

६. दैनिक लोकमत, 'नगर पंचशताब्दी विशेषांक', दि. ०२/०८/१९९०, पृ. क्र. १२९.

७. शेवाळे विठ्ठल, संपादन,'मी दतूचा दत्ता झालो त्याची गोष्ट', उपरोक्त, पृ. क्र. १०५.

८. साप्ताहिक युगांतर, महाराष्ट्र राज्य कम्युनिस्ट पक्षाचे मुखपत्र, दि. ३०/०७/१९७२, पृ. क्र. ८.

९. शेवाळे विठ्ठल, संपादन,'मी दतूचा दत्ता झालो त्याची गोष्ट', उपरोक्त, पृ. क्र. ६६-६७.

१०. बनसोड भीमराव, काकुस्ते सुभाष, वायकर आनंदराव आणि इतर,'क्रांतीवेध- कॅा. मधुकर कात्रे स्मृतीग्रंथ', प्रकाशक, कॅा. मधुकर कात्रे स्मृतीग्रंथ संपादन समिती, श्रमिक, टिळक रोड, अहमदनगर, प्रथमावृत्ती १६ जानेवारी २०१०, पृ. क्र. ८१-८२.

११. शेवाळे विठ्ठल (संपा.),'उज्ज्वल उद्यासाठी', (दिवंगत कॅा. दत्ता देशमुख विशेषांक) 'संघर्षयात्री', आनंद प्रिंटर्स, संगमनेर, त्रैमासिक नोव्हेंबर ते डिसेंबर २०१५,पृ. क्र. १६.

१२. कॅा. मधुकर कात्रे यांच्या आठवणी व आत्मनिवेदन (साखर कामगार युनियन), कॅसेट क्रमांक १, दि. २५/१०/२००६.

१३. बनसोड भीमराव, काकुस्ते सुभाष, वायकर आनंदराव आणि इतर,'क्रांतीवेध- कॅा. मधुकर कात्रे स्मृतीग्रंथ', उपरोक्त, पृ. क्र. ८२-८३.

१४. कित्ता, पृ. क्र. १६८.

१५. शेवाळे विठ्ठल (संपा.),'उज्ज्वल उद्यासाठी', (दिवंगत कॅा. दत्ता देशमुख विशेषांक), उपरोक्त, पृ. क्र. १७-१८.

१६. लालनिशाण अंक, दि. २५ जून १९७५, पृ. क्र. ४.

१७. बनसोड भीमराव, काकुस्ते सुभाष, वायकर आनंदराव आणि इतर,'क्रांतीवेध- कॅा. मधुकर कात्रे स्मृतीग्रंथ', उपरोक्त, पृ. क्र. १२५.

१८. उद्धृत, शेवाळे विठ्ठल (संपा.),'उज्ज्वल उद्यासाठी', (दिवंगत कॅा. दत्ता देशमुख विशेषांक), उपरोक्त, पृ. क्र. ४२.

१९. बनसोड भीमराव, काकुस्ते सुभाष, वायकर आनंदराव आणि इतर.,'क्रांतीवेध- कॅा. मधुकर कात्रे स्मृतीग्रंथ', उपरोक्त, पृ. क्र. ८८.